**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

**संशोधन विभाग**

जा.क्र.कबचौउमवि/११/संशोधन विभाग/अधि/बी.ओ.डी./ 1154 /२०२५ दि. १२/११/२०२५

# परिपत्रक

**विषय:- पीएच.डी. च्या संशोधक विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील संशोधन केंद्रात शुल्क आकारणी व इतर येणाऱ्या अडचणीबाबत**

**संदर्भ :- १) मा. अधिसभा ठराव क्र. अ.प्र.२५(५)/२०२५ दि. १७.१०.२०२५**

**२) मा. अधिष्ठाता मंडळ ठराव क्र. बी. ओ. डी. ए-१२१/२०२५ दि. ०८.११.२०२५**

महोदय,

आपणास वरील विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येत आहे की, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने मान्यता दिलेल्या संशोधक मार्गदशक व संशोधन केंद्रात संशोधक विद्यार्थी पीएच.डी. चे संशोधन करीत असतात. महाविद्यालयात विद्यार्थ्यांने विद्यापीठाने विहित केलेल्या परीपत्रक क्र. १२४/२०१९ दि. ०३.०७.२०१९ च्या अनुषगांने संशोधन केंद्राचे शुल्क दुसऱ्या वर्षापासून भरणे बाबत संशोधक विद्यार्थ्यांना कळविले आहे.

तथापि मा. अधिसभेत प्रश्नोत्तराच्या तासात काही संलग्नीत महाविद्यायातील संशोधन केंद्रात विद्यार्थ्यांकडून घेत असलेली फी विद्यापीठ परिपत्रक क्र. १२४/२०१९ नुसार न घेता त्याव्यतिरिक्त जास्त रक्कम घेऊन विद्यार्थ्यांची अडवणूक केली जाते, सहामाही प्रगती अहवाल सादर करतांना आर्थिक पिळवणूक केली जाते. तसेच ऑफलाईन व्हायवा खर्चाचा संशोधक विद्यार्थ्यांना नाहक आर्थिक फटका दिला जातो अशा आशयाची चर्चा होऊन अधिसभा सदस्यांनी याबाबत प्रंचड नाराजी व्यक्त केली व अशा प्रवृत्तींना प्रतिबंध करण्याबाबत संबधित संशोधन केंद्राची व मार्गदर्शक यांची मान्यता काढून घेणेबाबत चर्चा केली व तसे परिपत्रक निर्गमित करण्याची कार्यवाही करण्याच्या सुचना चर्चेद्वारे अधिसभेत दिल्या आहेत.

१.) तेव्हा यासंदर्भात संदर्भाकिंत क्र. १. च्या ठरावाच्या अनुषंगाने व मला प्राप्त झालेल्या आदेशान्वये कळविण्यात येते की, उपरोक्त परिच्छेदात उल्लेखनिय मुद्यानुसार संशोधक विद्यार्थ्यांची आर्थिक पिळवणूक व मानसिक त्रास होणार नाही याची काळजी संबधित संलग्नीत महाविद्यालयातील संशोधन केंद्र, संशोधन सल्लागार समिती सदस्य व मार्गदर्शक यांनी घ्यावी ही विनंती. संशोधक विद्यार्थ्यांना वरील प्रमाणे त्रास झाल्याबाबत तक्रारी आल्यास विद्यापीठाकडून मा. अधिसभेच्या बैठकीतील चर्चेच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येईल ही विनंती.

२) तसेच संदर्भाकिंत क्र. २ च्या मा. अधिष्ठाता मंडळाच्या ठरावानुसार व प्राप्त आदेशान्वये कळविण्यात येते की, संशोधक यांचेकडून सहामाही प्रगती अहवालामध्ये संशोधनाची सद्यस्थिती नमूद केलेली नसते तसेच अंतिम सहामाही अहवालात संशोधनाचा आढावा नमूद करुन व संशोधन कार्य पूर्ण झाले असून सिनॉप्सीस जमा करण्याची शिफारस करण्यात येत आहे, असे नमूद करणे अपेक्षित असते. मात्र असे नमूद करण्यात येत नाही. तसेच संशोधन सल्लागार समिती सिनॉप्सीस परवानगीची शिफारस करतांना या बाबी सहामाही अहवालात नसल्याचे सबंधित मार्गदर्शक यांचे निदर्शनास आणून देत नाही. तेव्हा मागदर्शक व संशोधन सल्लागार समिती यांनी संशोधक विद्यार्थ्यांने संशोधनाचा पूर्ण आढावा नमूद करणे व संशोधन कार्य पूर्ण झाल्याचे सहामाही अहवालात नमूद असल्याची खात्री केल्यानंतरच सिनॉप्सीस सादर करण्याची शिफारस करावी ही विनंती.

मा. प्राचार्य यांना विनंती की, सदर परीपत्रक आपल्या महाविद्यालयातील मार्गदर्शक व संशोधन सल्लागार समिती (RAC) यांच्या निदर्शनास आणून द्यावे ही विनंती.

आपला विश्वासू

सहा.कुलसचिव(अं.का)

संशोधन विभाग

प्रति,

1. **कबचौउमविशी संलग्नीत सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य व मान्यता प्राप्त परिसंस्थांचे मा. संचालक**
2. **मा. संचालक/विभागप्रमुख, विद्यापीठातील सर्व प्रशाळा/विभाग, कबचौउमवि, जळगाव**
3. **मा. सर्व मार्गदर्शक (विषयनिहाय)**